**निशाणी क्रमांक ३२ व ३३ वरील एकत्रीत आदेश**

१. वादीचा प्रस्तुतचा नि.क्र.३२ व ३३ वरील अर्ज तसेच त्यावरील प्रतिवादीचे म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकले. वादीचे म्हणणे की, प्रतिवादी क्र.२ काशिराम देवबा खासभागे दिनांक २९/०७/२०२० रोजी मरण पावल्याने प्रकरणात त्याचे कायदेशीर वारस प्रकरणात समाविष्ठ करण्यात यावे व त्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात यावा. यावर प्रतिवादीचे म्हणणे की, वादी व प्रतिवादी नं.२ काशिराम देवबा खासभागे हे एकाचा गावातील रहिवासी असून वादीला प्रतिवादी नं.२ काशिराम देवबा खासभागे मरण पावल्याबाबत पुर्ण माहिती होती तरीही वादीने मुदतीत प्रतिवादी नं.२ काशिराम देवबा खासभागे चे वारस प्रकरणात घेतले नाही. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

२. सदर दावा उद्‌घोषणा, अनिवार्य मनाईहुकूम व कायम मनाईहुकुम मिळण्याबाबत प्रतिवादीं विरूध्द दाखल केला आहे. सदर प्रकरणाचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र.२ काशिराम देवबा खासभागे दिनांक २९/०७/२०२० रोजी मयत झाला असुन वादीने सदर अर्ज प्रकरणात दिनांक ०८/०२/२०२२ रोजी दाखल केला आहे.

३. सदर अर्जात वादीने कोव्हीड—१९ या जागतिक महामारीची दुसरी स्टेज चालु झाल्याने व न्यायालयीन कामकाज व्यवस्थीतरीत्या सुरू नसल्याने तसेच सदरच्या कालावधी दरम्यान वादीची तब्येत खराब असल्यामुळे त्याने विहीत कालावधीमध्ये प्रतिवादी नं.२ काशिराम देवबा खासभागे चे वारस प्रकरणात समाविष्ठ केले नाही असे नमूद केले आहे. तरी सदर प्रकरणाची बाब पाहता प्रतिवादी नं.२ काशिराम देवबा खासभागे याचे वारस प्रकरणात समाविष्ट करून घेतल्यास कोणाचेही नुकसान होणार नाही. प्रकरणाबाबत दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकुण प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढणे योग्य आहे. तरी वादीला प्रतिवादी नं.२ काशिराम देवबा खासभागे चे वारस प्रकरणात समाविष्ट

करण्याकरीता झालेला १८ महिना १७ दिवसाचा विलंब माफ करण्याकरीता दंड रूपये १०००/— लावून नि.क्र.३२ वरील अर्ज मंजुर करण्यात येतो. तसेच वादीचा नि.क्र.३३ वरील प्रतिवादी नं.२ काशिराम देवबा खासभागे चे वारस रेकॉर्डवर घेण्याकरीता परवानगीचा अर्ज मंजुर करण्यात येतो. वादीने पुढील तारखेपर्यंत प्रतिवादी क्र.२ काशिराम देवबा खासभागे यांचे प्रस्तुत अर्जातील नमूद वारस नि.क्र.१ वर समाविष्ठ करावे. तसेच प्रकरण सन २०१८ चे असल्याने प्रकरणात लवकरात लवकर योग्य कार्यवाही करावी. तसेच दंडाची रक्कम रूपये १०००/— जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वाशिम येथे पुढील तारखेपर्यंत जमा करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SWATI VIJAYANAND PHULBANDHE
Date: 2022.03.30 18:01:05 +0530

(श्रीमती एस. व्ही. फुलबांधे)
दिनांक — ३०.०३.२०२२ सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर), वाशिम.

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

Court Name : Jt. Civil Judge (S.D.), Washim, Dist.Washim.

Date : 30.03.2022.

Order signed by the presiding officer on : 30.03.2022.

Order uploaded on : 30.03.2022.

Order uploaded by : Mahesh S Takwale (Stenographer Grade-III.)